डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स



राष्ट्रीय पूनर्मूल्यांकन व अधिस्वीकृती 'अ' श्रेणी

**८४५, शिवाजीनगर पुणे – ४११ ००४. महाराष्ट्र – भारत.**

स्वायत्त महाविद्यालय, संलग्न, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Senior College (I.D.No. Pu/Pn/C/010[1943]) - Junior College No. 11-11-007

जा.क्र. ४८२ /२०१९-२० दि. २४.०१.२०२०

प्रति,
मा. अध्यक्ष,
कॉसमॉस सहकारी बँक लि.,
पुणे.४११००७

**विषय- महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बँक प्रशिक्षण व सेवेत घेणे बाबत.**

महोदय,

कॉसमॉस सहकारी बँक ही सहकार क्षेत्रातील नामांकित बँक आहे.

महाविद्यालयाला जून २०१७ पासून 'स्वायत्त महाविद्यालय' ( Autonomous College ) असा दर्जा विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाने दिलेला आहे. या अनुषंगाने या महाविद्यालयाने उद्योग, व्यापार, बँक इत्यादी व्यवसायांना आवश्यक असणारे तंत्रज्ञान, व्यवसाय, उद्योग प्रक्रिया यांचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. स्वायत्ततेमुळे अभ्यासक्रम अद्ययावत ठेवणे शक्य झाल्याने विद्यार्थी व्यावसायिकदृष्ट्या जास्त कार्यक्षम होतील.

अनेक कंपन्या व बँका बी.एम्.सी.सी.तून Campus Placement मधून विद्यार्थी निवडत आहेत. याचा उपयोग आपल्याही बँकेत कुशल मनुष्यबळ मिळण्यासाठी होणार आहे. बीएमसीसी व कॉसमॉस सहकारी बँक यांच्यात एक नाते निर्माण होऊन ते घनिष्ठ व्हावे, त्यासाठी

- कॉसमॉस बँकेच्या तज्ञ अधिकाऱ्यांकडून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे.
- विद्यार्थ्यांना इंटर्नशिप द्वारे बँकेच्या कामकाजाचे व्यवहार ज्ञान प्राप्त व्हावे.
- महाविद्यालयाच्या निवडक शैक्षणिक उपक्रमांना प्रायोजकता मिळणे.
- इंटर्नशिप मध्ये विद्यार्थी योग्य वाटल्यास त्याला बँकेत नियुक्तीसाठी बँकेच्या धोरणानुसार प्रयत्न करण्याची संधी मिळणे.

आपणास विनंती की, बी.एम्. कोलेज ऑफ कॉमर्स येथील विद्यार्थ्यांना बँक सेवा प्रशिक्षण व सेवेत समविष्ट करून घेण्याविषयी मार्गदर्शन व सहकार्य मिळावे.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.आ.मु.पुराणिक)
उप-प्राचार्य

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) पुणे-४

Received
Rajaishwari

दूरध्वनी : कार्यालय ६७६५६२००, ६७६५६२०५ प्राचार्य : ६७६५६२०३ ई-मेल : office@bmcc.ac.in फॅक्स : ०२० ६७६५६२०९ वेबसाईट : www.bmcc.ac.in
व्यावसायिक अभ्यासक्रम : ६७६५६२१५, ६७६५६२१६ ई-मेल : bbabmcc@yahoo.co.in